
# जेली माशाची जीवनकथा

समुद्राच्या पाण्यात काही वेळा टोपीसारखे किंवा छत्रीसारखे भाग तरंगताना दिसतात. ते निर्जीव असावेत असा आपला समज होतो. नीट निरीक्षण केल्यास ते हालचाल करीत आहेत असे वाटते. पण लगेच मनात येते की हे छत्रीसारखे भाग हालचाल करीत आहेत का पाण्याच्या प्रवाहाबरोबर अगर लाटेबरोबर ढकलले जात आहेत म्हणून त्यांची हालचाल होत आहे? खरोखरीच ते काय आहे हे जाणून घेण्याकरिता तुम्ही त्यांना पकडण्याचा प्रयत्न केलात तर ते दंश करतात व मग ते जिवंत प्राणी असावेत असे आपणास पटते.



समुद्रात तरंगणाऱ्या या टोपीसारख्या, छत्रीसारख्या किंवा भूछत्रासारख्या भागास जेली मासा म्हणतात.

ग्रीक पुराणात डोक्यावर केसाऐवजी साप असलेली बाई असे त्यांचे वर्णन आहे. त्याच पुराणात पुढे असेही म्हटले आहे की त्या बाईकडे जो पाहील त्याचे रूपांतर दगडात होईल. पुराणातली वांगी पुराणातच ठेवली पाहिजेत. कारण प्राणि– शास्त्रज्ञांनी नुसते त्यांच्याकडे पाहिलेच नाही तर त्यांना पकडले सुद्धा आहे व त्यांच्या जीवनकथेचा अभ्यास केला आहे.

हा मासा लाटेबरोबर पाण्याच्या बाहेर फेकला गेला तर त्याला आकार राहात नाही. जेली खडकावर ओतली तर जशी पसरते व उष्णतेने वितळते त्याप्रमाणे त्याचे शरीर आकारहीन होते व वितळत आहे असे वाटते. शेवटी कोळ्याच्या जाळ्यासारखा पारदर्शक भाग शिल्लक राहतो. त्यात पेशी असतात. जेली माशाचे शरीर असे जेलीसारखे असते.

टोपीसारख्या भागाच्या मध्यभागी आतील बाजूस या माशाचे तोंड असते व कडेच्या भागापासून मुळासारखे अवयव फुटलेले असतात. हा प्राणी फार अधाशी आहे. मिळेल ते तो तोंडात घालतो व पोटात ढकलतो. समुद्रातील सूक्ष्म जीवांवर तो आपली उपजीविका करतो. समुद्रातील मोठे प्राणी याला खाऊन आपली उपजीविका करतात.

जेली माशात नर व मादी असा भेद असतो. नरात

(चि.क्र.१) ४ मुष्क (टेस्टीज) व मादीत (चि.क.२) चार अंदुकी (ओव्ह रीज) असतात. नराचे रेतुक पाण्याच्या प्रवाहाबरोबर मादीच्या तोंडात जातात व त्यांचा अंदुकाशी संयोग होतो. संयोगामुळे रंदुक किंवा झायगोट तयार होतो (चि.क्र. ३).

रंदुकाची विभागणी होते. (चि.क्र.४) व त्यापासून गोल आकाराचा पेशीमय भाग तयार होतो. (चि.क्र.५) या गोलाकार भागाचे एक टोक आतील बाजूस वळते व त्यापासून पेशीचे दोन थर असलेला भाग तयार होतो. (चि.क्र.६) या भागावर बारीक केस उगवतात. या वेळी तो भाग मोकळेपणाने पाण्यात पोहतो. (चि.क्र.७) नंतर तो तळाशी जातो. त्या वेळी त्याचे केस नाहीसे होऊ लागतात व त्याची रुंद बाजू तळाशी असलेल्या कोणत्यातरी वस्तूला चिकटते व तो स्थिर होतो (चि.क्र.८).

यानंतर त्याच्या शरीरात अवस्थांतर घडते व त्यास चार शुण्डके (टेन्टॅकल्स) फुटतात. (चि.क्र.९) शुण्डकांची संख्या वाढते. (चि.क्र.१०) व वरील भाग रुंद होतो. या वेळेपर्यंत त्याचे तोंड तयार झालेले असते. तोंडावाटे तो अन्नग्रहण करतो व अन्नाचा साठाही करतो. अशा स्थितीत तो पुष्कळ काळ राहतो (चि.क्र.११).

पुढील हंगामात त्याच्या शरीराचे आडवे विभाजन होऊन सुमारे १२ भाग तयार होतात. (चि.क्र.१२) या वेळी अनेक बशा एकमेकांवर ठेवल्या आहेत असे शरीर दिसते. हे सर्व भाग एकमेकांशी स्नायूने जोडलेले असतात.

नंतर हे स्नायू तुटतात व बशीसारखा एक एक भाग सुटा होऊ लागतो. (चि.क्र.१३) त्यात वाढ होऊन (चि.क्र.१४) अखेर जेली मासा तयार होतो. अशी असते जेली माशाची जीवनकथा.

◆

**प्रा. य. बा. राजे , श्री. चं. ह. पाटील**